आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दसरा, विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरात उत्साहाचं वातावरण

- देशात महिलांवर होत असलेल्या अत्याचारांबद्दल सरसंघचालक मोहन भागवत यांच्याकडून चिंता व्यक्त, नागपुरात दीक्षाभूमीवर सामुहिक बौद्धवंदना

- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर ९१ हजार आंतरवासिता संधी उपलब्ध, आजपासून उमेदवारांना अर्ज करता येणार

**आणि**

- बांग्लादेश विरुद्धच्या टी -२० मालिकेतला भारताचा तिसरा आणि अखेरचा सामना आज संध्याकाळी हैदराबादमध्ये

**<><><><><>**

विजयादशमीचा सण हा अन्यायावर न्यायाचा विजय मिळवणारा तसंच सत्य आणि सदाचार या मूल्यावर विश्वास वाढवणारा सण आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशातल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

या दिवशी सर्व नागरिकांनी  दुष्कृत्यांचा नाश  करण्याची प्रतिज्ञा घ्यावी, असं आवाहन करत **उपराष्ट्रपती** जगदीप धनखड यांनी देशवासियांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

माँ-दुर्गा देवी आणि श्रीरामांच्या आशीर्वादानं नागरिक प्रत्येक क्षेत्रात विजय आणि यश मिळतील, अशा शब्दात **प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनी जनतेला समाज माध्यमांद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत.

सीमारेषा ओलांडून विकासाचं आणि प्रगतीचं सोनं वाटायला शिकवणाऱ्या या सणाच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्या दिल्या आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केलं आहे.

अनिष्ट प्रथांवर विजय मिळवणारा दसऱ्याचा हा पवित्र सण आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समृध्दी आणि आनंद घेऊन येवो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच त्यांनी भारतीय संविधानाचे जनक, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करत धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

दसरा सणाच्या निमित्तानं लोकहिताच्या योजना पात्र घटकांपर्यंत पोहोचवून राज्याच्या हितासाठी आणि सर्व समाजघटकांच्या विकासासाठी प्रयत्न करूया, असं आवाहन करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील शुभेच्छा दिल्या आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज दार्जिलिंगमध्ये शस्त्रपूजा केली आणि लष्कराच्या जवानांसोबत दसरा साजरा केला. त्यानंतर सीमा रस्ते संघटनेच्या ७५ प्रकल्पांचं लोकार्पणही त्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये सिंदूर खेला आणि धुनुची नाच या कार्यक्रमानंतर नद्या आणि इतर जलकुंभांमध्ये आज देवीच्या मूर्तींचं विसर्जन होत आहे. यानंतर पश्चिम बंगाल मधल्या  दुर्गा पूजा उत्सवाची सांगता होईल. दरम्यान, येत्या मंगळवारी कोलकता इथं दुर्गा पूजा कार्निव्हल आयोजित केलं जाणार आहे. यामध्ये काही उत्कृष्ट मूर्तींचं प्रदर्शन मांडण्यात येणार असून या प्रदर्शनाला स्थानिकांसह अनेक आंतरराष्ट्रीय पर्यटक देखील भेट देतील.

<><><><><>

कर्नाटकातल्या मैसूरू इथं गेल्या १० दिवसांपासून रंगलेला दसरा महोत्सव आज संध्याकाळी जंबो सवारीनं संपन्न होईल. दसऱ्याची ही परंपरा विजयनगर साम्राज्याच्या काळापासून, म्हणजे १४ ते १५व्या शतकापासून सुरू आहे आणि राज्य सरकारनं ती कायम राखली आहे. अभिमन्यू या विशेष हत्तीवर ठेवलेल्या साडे सातशे किलो वजनाच्या सोन्याच्या हौद्यात ठेवलेल्या देवी चामुंडेश्वरीची पूजा मुख्यमंत्री सिद्ध-रामय्या करणार आहेत. जगप्रसिद्ध असलेला मैसूरूचा दसरा महोत्सव बघण्यासाठी दर वर्षी लाखो पर्यटक मैसूरूला येतात.

<><><><><>

देशात महिलांवरच्या अत्याचारांबद्दल सरसंघचालक मोहन भागवत यांनी चिंता व्यक्त केली आहे. कोलकत्ता इथल्या रुग्णालयात घडलेली  घृणास्पद घटना म्हणजे गुन्हेगारी आणि राजकारण यांच्यातल्या परस्पर संबधांचा  दुष्परिणाम आहे, असं ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या ९९ व्या स्थापना दिनानिमित्त आज सकाळी नागपूर इथं आयोजित विजयादशमीच्या मुख्य कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. इस्त्रो अर्थात  भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन मुख्य अतिथि म्हणून उपस्थित होते. ‘तंत्रज्ञानानं  शैक्षणिक संस्थांमध्ये

बदल घडवून आणला आहे. नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल', असा विश्वास डॉ राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला. रेशीमबाग मैदानावर देशभरातून आलेल्या स्वयंसेवकांच्या पथसंचालनानं या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी मोहन भागवत यांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह अन्य मान्यवर तसंच संघस्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

देशासह राज्याच्या विविध भागात संघ स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात संचलनात भाग घेतला.

<><><><><>

६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज देशभरासह राज्यात साजरा होत आहे. १९५६ साली विजयादशमीच्या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूर इथल्या दीक्षाभुमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. त्या दिवसाचं स्मरण म्हणून धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो.

नागपूर इथं आज भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सामुहिक बुद्धवंदना झाली. यावेळी समता सैनिक दलाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देऊन अभिवादन केलं. संध्याकाळी सहा वाजता दीक्षाभुमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी देशभरातून बौद्धअनुयायी नागपुरात दाखल झाले आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून अनुयायांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

<><><><><>

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आज मुंबईत चैत्यभूमी आणि टिळकनगर सर्वोदय महाबुद्ध विहार इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><>**

शिवसेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांचे दसरा मेळावे आज मुंबईत होत आहेत. आझाद मैदानावर होणाऱ्या मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर शिवाजी पार्क मध्ये होणाऱ्या मेळाव्याला  माजी उपमुख्यमंत्री उद्धव ठाकरे संबोधित करतील. दोन्ही पक्षांकडून मेळाव्याच्या प्रचारासाठी मोठमोठे फलक लावण्यात आले आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर आतापर्यंत १९३ कंपन्यांनी ९१ हजार इंटर्नशिप म्हणजेच आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे पोर्टल आजपासून अर्जदारांसाठी खुलं झालं असून अर्जदार २५ ऑक्टोबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात. कंपन्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आंतरवासिता संधीबाबत या पोर्टलवर माहिती देणार असून यामध्ये तेल, वायू, उर्जा, पर्यटन यासारख्या विविध २४ क्षेत्रांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात २१ ते २४ वर्षे वयोगटातल्या सव्वा लाख जणांना आंतरवासिता संधी मिळवून देण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. आंतरवासिता उमेदवाराला एका वर्षासाठी दरमहा ५ हजार रुपये तर एक रकमी अनुदान म्हणून ६ हजार रुपये दिले जाणार आहेत.

**<><><><>**

हरियाणातल्या नव्या सरकारचा शपथविधी गुरुवारी १७ ऑक्टोबरला होणार आहे. मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांच्यासह काही मंत्री पंचकुलामध्ये पद आणि गोपनीयतेची शपथ घेतील. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

<><><><>

बांग्लादेश विरुद्धच्या टी २० मालिकेतला भारताचा तिसरा आणि अखेरचा सामना आज संध्याकाळी ७ वाजता हैदराबादमध्ये होणार आहे. आतापर्यंत झालेले दोन्ही सामने भारतानं जिंकले आहेत. आजचा सामना जिंकून निर्भेळ यश मिळवण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न आहे.

<><><><>

टी २० विश्वचषक स्पर्धेत अ गटात न्यूझीलंडच्या महिला संघाचा सामना आज श्रीलंकेसोबत दुपारी शारजामध्ये होईल. ब गटात संध्याकाळी दक्षिण आफ्रिका आणि बांग्लादेश यांच्यात सामना होणार आहे.

<><><><>

IWLF राष्ट्रीय भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत हरमनप्रीत कौरनं ७६ किलो वजनी गटात राष्ट्रीय विक्रम नोंदवला. तिनं थेट १२७ किलो आणि जर्कसह २२३ किलो वजन उचललं. एकूण श्रेणीत जी. रविशंकर यांनंही ३११ किलो वजन उचलून नवीन राष्ट्रीय विक्रम नोंदवला.

//<><><><>//